महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. MPSC-११०२३/१/२०२१-IT

दिनांक:-३ सप्टेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिकृत ट्विटर खात्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोगाच्या भरतीप्रक्रियांसंदर्भातील माहिती उमेदवारांना सहजरित्या उपलब्ध व्हावी. तसेच, आयोगाच्या भरतीप्रक्रियासंदर्भातील उमेदवारांच्या मागण्या/प्रश्न/गा-हाणी यांची वेळेत दखल घेता यावी. या हेतूने दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी आयोगाच्या कार्यालयाचे अधिकृत ट्विटर खाते सुरु करण्यात आले आहे. सदर खात्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

युजर नेम:- @mpsc_office

२. आयोगाच्या कार्यालयाच्या सदर ट्विटर खात्यावरुन महत्वाची प्रसिध्दीपत्रके, महत्वाची माहिती, इत्यादी उमेदवारांना उपलब्ध करुन देण्याचा आयोगाच्या कार्यालयाचा मानस आहे. आयोगाच्या कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात येणा-या ट्विटवर प्रतिक्रिया देताना उमेदवार तसेच अन्य व्यक्तींकडून सामाजिक सभ्यता व संसदीय भाषाशैलीचा वापर केला जाईल, अशी अपेक्षा आहे.

३. आयोगाच्या सदर खात्यावरील ट्विट्स व रिट्वीटसद्वारे उमेदवार व अन्य व्यक्तींकडून दिल्या जाणा-या प्रत्येक प्रतिक्रिया, गा-हाणी यांवर आयोगाच्या कार्यालयास वैयक्तिकरित्या उत्तर देणे शक्य होणार नाही. तथापि, प्राप्त होणा-या प्रतिक्रियांचा एकत्रित आढावा घेऊन आयोगाची भूमिका वेळोवेळी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच, सदर प्रतिक्रियांच्या आधारे आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

४. प्रस्तुत प्रसिध्दीपत्रकाद्वारे असेही आवाहन करते की, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे, खाजगी क्लासेस, उमेदवारांच्या संघटना व उमेदवार यांच्याकडून आयोगाच्या नावाचा, मुद्रेचा (लोगो) ट्विटर तसेच इतर समाज माध्यमांमधून करण्यात येत असलेला वापर त्वरित बंद करण्यात यावा. अन्यथा, अशा सर्व संबंधितांवर आयोगाकडून योग्य ती कायदेशीर व/अथवा आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल.

ठिकाण:- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग